
बड़े अच्छे लगते हैं...



गीताबाली


पृथ्वीराज कपूर


मधुबाला


राज कपूर


नूतन


वैजयंती माला


राजकुमार

फिल्मिलेनियम
२०००

१९१३ पासून चित्रपटाचे युग सुरू झाले. मूकपटांपासून ते बोलपटांपर्यंत नि बोलपटांपासून ते आजच्या ॲक्शनच्या काळापर्यंत हिंदी चित्रपटाने मोठी मजल मारली. नव्या शतकात प्रवेश करताना आपल्या भूतकाळावर टाकलेली ही एक धावती नजर...

□ यासिन दलाल

गिनिस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डची मिलेनियम आवृत्ती बाहेर आली त्यात हिंदी चित्रपटांवर दोन पाने मजकूर दिला गेला यावरूनच हिंदी चित्रपटांच्या व्यापारविश्वाच्या कक्षा कशा उंचावल्यात ते कळते. शिवाजी गणेशनपासून ते दिलीपकुमार व संजीवकुमार यांच्यापर्यंत तर शोभना समर्थपासून माधुरी दीक्षितपर्यंत सर्वांची नावे त्यात आलीत. जगातील सर्वात मोठे फिल्मी कुटुंब म्हणून पृथ्वीराज कपूर यांच्या कुटुंबाचा व तीन पिढ्यांच्या यशस्वी नायिका म्हणून शोभना समर्थ, नूतन व काजोल यांचा त्यात उल्लेख आहे.

आपला फिल्मी इतिहास दोन भागात विभागलेला आहे. १९१३ ते ३१पर्यंतचा काळ मूकपटांचा. या काळात सुमारे १२६८ मूक चित्रपट बनले. त्यात नायक जॉन कावस व नायिका नादिया सारखे कलाकार अग्रणी होते. डी. बिलिमोरिया, साधना बोस, रूबी मायर्स, पृथ्वीराज, ललिता पवार यांच्यासारखी नावेही त्या मूकपटात झळकत होती. तेव्हा चेहऱ्यावरचे हावभाव व आंगिक अभिनय एवढ्याच भांडवलावर चित्रपटात भाव-संवेदना व्यक्त करायच्या असत. त्यामुळे तेव्हाच्या चित्रपटात काम करणे हे एक मोठे आव्हानच होते. इर्मेलीन, माधुरी, मिस रोज, लोलो, गुलाब, गोहर बानू या त्यावेळच्या सौंदर्यवती होत्या.

बोलपटांचा काळ सुरू झाला आणि मूकपटांमधील अनेक हीरो-हिरॉईन्स निकामी झाल्या. या नायिकांपैकी बऱ्याच अँग्लोइंडियन असल्याने त्या शुद्ध हिंदी व उर्दू बोलू शकत नव्हत्या. चित्रपट बोलू लागला तसे विषयही बदलत गेले. ॲक्शन, स्टंट व धार्मिक पटांपासून दूर होत वेगळे काही देण्याचा, सामाजिक प्रश्न चित्रपटातून मांडण्याचा प्रयत्न सुरू झाला.

मूकपटांच्या नायिका

मूकपटाच्या काळापासून अभिनय कारकीर्द गाजवणाऱ्या व शेवटच्या श्वासापर्यंत अभिनय करत राहणाऱ्या अभिनेत्रींमध्ये दुर्गा खोटे व ललिता पवार यांची नावे खास घ्यावी लागतील. नानूभाई देसाईंचा पहिला बोलपट *गुलबकावली*ची नायिका झेबुन्निसा शेवटी *राम और श्याम*मध्ये दिसली होती. त्याकाळातील जाणकार नायिका हुस्नबानू *गंगा जमना* या बोलपटात शेवटची चमकली. रूबी मायर्स उर्फ सुलोचना तीनवेळा बनलेल्या *अनारकली*त भूमिका केली. पहिल्या दोन *अनारकली* चित्रपटांमध्ये ती नायिका होती तर शेवटच्या *अनारकली*त ती जोधाबाई बनली. *वीरबाला* नामक मूकपटात फिल्मी कारकीर्द सुरू करणाऱ्या सुलोचनाने राज कपूर यांच्या *बॉबी* चित्रपटात काम केलेले.

पहिला हिंदी बोलपट असलेल्या *आलमआरा*त मास्टर विठ्ठल यांच्यासमोर झुबेदा नामक नायिका होती. पण नंतर ती गायब झाली. झुबेदाप्रमाणेच त्या काळातल्या इर्मेलीन, मिस रोज या सौंदर्यवतींची जागा उत्तर प्रदेशातील कोठेवाल्या आणि त्यांच्या मुलींनी घेतली. नरगीसची आई जद्दनबाई हिने चित्रपटाला संगीतही दिलेले. नसीम, नरगीस, निम्मी, मीनाकुमारीसारख्या अभिनेत्री मग पडद्यावर झळकू लागल्या. सुरैया, कामिनी कौशल, निगार सुलताना, मुनव्वर सुलताना, गीताबाली यासारख्या गायिकांचाही काळ आला. दादासाहेब फाळके यांच्या पहिल्या चित्रपटाला कुणी नायिका मिळेना तेव्हा साळू नामक मुलालाच त्यांनी नायिका बनवले. त्यांच्या *भस्मासूर मोहिनी* या दुसऱ्या चित्रपटात त्यांनी मराठी रंगमंचावर वावरणाऱ्या कमलाबाई गोखलेंना नायिका बनवले. कमलाबाई गोखले या बोलपटाच्या पहिल्या अभिनेत्री. विक्रम गोखलेंच्या आजी कमलाबाईंनंतर १९३८ साली मीनाक्षी शिरोडकर नामक आणखी एक मराठी नायिका पडद्यावर झळकली. मास्टर विनायक यांच्या *ब्रह्मचारी* चित्रपटात स्नानदृश्य देण्याचे साहस मीनाक्षीने केले नि त्या दृश्याने एकच खळबळ उडवलेली. 'यमुनाजळी खेळू खेळ कन्हैया...' हे गाणे तेव्हा खूप गाजले होते. एचएमव्हीला या गाण्याच्या लोकप्रियतेमुळे दोनवेळी या रेकॉर्ड बाजारात आणाव्या लागल्या. यानंतर मेहताब बानूने केदार शर्मांच्या *चित्रलेखा* चित्रपटात स्नानदृश्य दिलेले. त्याचाही त्याकाळी खूप गवगवा झाला. मेहताब बानूने सोहराब मोदींबरोबर विवाह केला व त्यांच्याच *झांसी की रानी*त लक्ष्मीबाईची भूमिका करून तिने क्षेत्रसंन्यास घेतला.

सोहराब मोदींनीच सायरा बानूची आई नसीम बानूला *खान बहादूर* सारख्या चित्रपटात प्रथम संधी दिली. *पुकार*मध्ये नसीम व चंद्रमोहन यांची जोडी उत्तम जमली होती.

जुन्या काळातील नायिका समाजातील भरडल्या गेलेल्या वर्गातून आल्याने आपला स्वाभीमान व प्रतिष्ठा याबाबत त्या खूप जागरूक होत्या. स्नेहलता प्रधान नामक नायिका *सिव्हिल मॅरेज* नामक



चित्रपटाद्वारा पडद्यावर आली. पण अल्पावधीतच तिने क्षेत्रसंन्यास घेतला.

बंगालच्या साधना बोसचा एकेकाळी एवढा रूबाब होता की, लोक तिची हॉलीवूडच्या जीन

हार्लेबरोबर तुलना करत. हिंदी सिनेमात शास्त्रीय नृत्य शिकून प्रवेशणारी ती पहिली नायिका होती. तिच्या नृत्याभ्यासाचा उपयोग करून घेण्यासाठी १९४१ साली होमी वाडिया यांनी *राजनर्तकी* नामक चित्रपटात तिला चमकवले. पृथ्वीराज व साधना बोस यांच्या जोडीचा बोलबाला हॉलीवूडपर्यंत पोहोचला होता. याच प्रमाणे त्याकाळी देविकाराणी व हिमांशू राय या जोडीचे चित्रपट जर्मनीच्या सहकार्याने बनत व त्याचे प्रिमियरही बहुतांशी जर्मनीतच होत. गायिका राजकुमारीही त्या काळात नायिका होती आणि आपली गीते ती स्वतःच गात. पद्मादेवी देखील *किसान कन्या* नामक चित्रपटाद्वारा आली व *पृथ्वीराज संयुक्ता* तसेच *वानरसेना* सारख्या एका चित्रपटात काम करून बंगालला रवाना झाली. उमाशशी नामक अभिनेत्री सायगल यांच्याबरोबर *चंडीदास* चित्रपटात चमकली होती. तर दुसरीकडे कलकत्त्यातून न्यू थिएटर्स संस्थेद्वारा चित्रपटात आलेल्या काननदेवी, भारती, लीला देसाई याही नायिकांनी आपला मोठा प्रेक्षक वर्ग निर्माण केलेला. काननदेवीने कर्णमधूर गीतेही दिलीत. त्यामुळे *जवाब*, *मुक्ती* सारख्या चित्रपटात अभिनय करून ख्यातनाम झाल्या. याचप्रमाणे व्ही. शांताराम यांच्या चित्रपटात चमकलेल्या शांता आपटे, शांता हुबळीकर, जयश्री व संध्या या नायिका दिल्या. तर हिमांशू राय यांच्या बॉम्बे टॉकीजने देविका राणी, लीला चिटणीस यांना उदयास आणले. रणजित कंपनीने खुरशीद, स्वर्णलता, नूरजहाँ यांना चित्रपटात आणले पण देशाच्या फाळणीनंतर त्या पाकिस्तानात गेल्या. फाळणीपूर्वी पंचोलींच्या चित्रपटांद्वारा रमोला व नूरजहाँ या लाहोरच्या नायिकांचा उदय झालेला पण *जुगनू* व *अनमोल घडी* सारख्या चित्रपटांमध्ये काम करून कारकीर्दीच्या कळसावर असतानाही नूरजहाँने फाळणीनंतर पाकिस्तानात पळ काढला.


१९४० ते ४७ या काळात सवितादेवी, माया बॅनर्जी, सितारा, प्रतिमा दासगुप्ता, मीना गौरी, रागिणी या नायिका प्रमुख होत्या. यात मीना शौरी अल्लड अभिनयाचे प्रदर्शन करण्यात वाक्‌बगार. त्यामुळे तिची शैली इतरांहून वेगळी होती.

*एक थी लडकी*च्या 'लारा लप्पा लारा लप्पा' गाण्याद्वारा तिचे 'लारा लप्पा गर्ल' म्हणून नाव पडले. माया बॅनर्जी चुंबन गर्ल म्हणूनच ओळखली जायची. गझलसम्राज्ञी बेगम अख्तरने मेहबूब यांच्या *रोटी* चित्रपटात तिने नायिकेची भूमिका केलेली. सरदार अख्तर, मेहताब बानू व गौहरबानू या तीन अभिनेत्रींचे त्रिकूट तेव्हा प्रसिद्ध होते. सरदार अख्तरने मेहबूब यांच्याशी लग्न केले, मेहताब बानूने सोहराब मोदींशी व गौहर बानूने चंदुलाल शाह यांच्याबरोबर संसार थाटले. सुरैयाही तिच्या काळात विशेष लोकप्रिय होती. *शायर*, *विद्या*, *जीत*मध्ये तिची देव आनंदबरोबर जोडी जमली. सुरैयासारखी गायिका अभिनेत्री नंतर दुसरी कुणी आली नाही.

याकाळात *रतन*ची स्वर्णलता, *अफसाना*ची वीणा, *बरसात*ची निम्मी, *बाजार* आणि *पतंगा*ची निगार या नायिका खूप गाजल्या होत्या.



निम्मी



वहीदा रहेमान-देव आनंद



मिस अनवरी



कामिनी कौशल

मधुबालाचे मोहक व्यक्तिमत्त्व

हॉलीवूडचे दिग्गज चित्रनिर्माते ॲलेक्झांड्रा क्वाड्रा एकदा भारतात आलेले. मधुबालाने त्यांच्या एखाद्या तरी चित्रपटात काम करावे, अशी त्यांची इच्छा होती. पण मधुबालाच्या पित्याने या प्रस्तावाला स्पष्ट नकार देऊन त्यांची बोळवण केली. जगभरात हॉलीवूडच्या मार्लिन मन्टो व सोफिया लॉरेन यांची सौंदर्यवती म्हणून ख्याती होती. त्याहूनही सौंदर्यसम्राज्ञी म्हणून मधुबालाचा गवगवा भारतात कितीतरी पटीने जास्त होता. एकीकडे *मुगल-ए-आझम* तर दुसरीकडे गुरूदत्त यांचा *मि. ॲण्ड मिसिस ५५* असे चित्रपट करून मधुबाला सामाजिक व कॉमेडी चित्रपटांचा समतोल साधत होती. *चलती का नाम गाडी*, *गेटवे ऑफ इंडिया*, *हावडा ब्रीज*, *काला पानी*, *जाली नोट* या चित्रपटातला तिचा अभिनय उत्तमच होता. हे चित्रपट कथेच्या दृष्टीने फारच दुबळे होते तरी मधुबालाच्या अभिनयाने नि आकर्षणाने ते तारले.

मीनाकुमारी-नरगीस

मधुबालाशी स्पर्धा करणाऱ्या आणखी सहा-सात अभिनेत्री हिंदी पडद्यावर ५०-६०च्या दशकात आल्या. यात ट्रॅजेडी क्वीन मीनाकुमारीचा नंबर पहिला लागेल. *मगरूर*, *मदहोश*, *सनम* सारख्या चित्रपटात हास्यपूर्ण भूमिकात चमकलेल्या मीनाकुमारीच्या चेहऱ्यावर *बैजू बावरा*नंतर कधी हास्य उमटलेच नाही. *बैजू बावरा*पासून *पाकिजा*पर्यंत मीनाकुमारी ट्रॅजेडी क्वीनच बनून राह्यली.

डॉक्टर बनण्याची स्वप्ने बाळगून मुंबईला आलेली नरगीस योगायोगाने चित्रपटात येऊन थडकली. मेहबूब यांच्या *तकदीर* चित्रपटाद्वारा तिचा पडद्यावर प्रवेश झाला. *अंदाज* चित्रपटाच्यावेळी राज कपूरची नजर तिच्यावर



नलिनी जयवंत
विना राय
मीनाकुमारी
नादिया

गेली व पहिल्याच नजरेत दोघे प्रेमात पडले. मग आर. के. कॅम्पमध्ये नरगीसचा प्रवेश झाला आणि *आह, आवारा, श्री ४२०* सारख्या चित्रपटांद्वारा राज-नरगीस जोडी पडद्यावर जमली. राज कपूर यांच्या व्यक्तिगत जीवनात मोठी उलथापालथ झाल्यावर नरगीस आर. के. कॅम्पमधून बाहेर पडून मेहबूब यांच्या कंपूत गेली. तिथे *मदर इंडिया, बाबूल, दीदार* सारखे हिट चित्रपट तिने दिले.

शोभना समर्थची कन्या नूतन ही एक असामान्य प्रतिभेची मालकीण. बिमल रॉय यांच्या *बंदिनी, सुजाता* चित्रपटात तिने आपली प्रतिभा पुरेपूर सिद्ध करून दाखवली. नरगीस आर. के. कंपूतून बाहेर पडल्यावर राज कपूर यांनी *अनाडी, दिल ही तो है* चित्रपटांमध्ये नरगीस ऐवजी नूतनला नायिका म्हणून चमकवले. *सीमा* चित्रपटात बलराज साहनींबरोबर व नंतर *कस्तुरी* चित्रपटात त्यांचा मुलगा परीक्षित साहनी बरोबर नूतन नायिकेच्या भूमिकेत चमकलेली.

हिंदी चित्रपटांच्या सुवर्णकाळात तेव्हा वनमाला खुरशीद, बीना रॉय, निम्मी, बेगमपारा, कामिनी कौशल, नलिनी जयवंत या नायिकाही पडद्यावर वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावत होत्या. त्यांच्याप्रमाणेच उषा किरण, निरूपा रॉय, श्यामा, शशीकला, शकीला चित्रा, कुमकुम, कृष्णाकुमारी, कम्मो, शीला वाज, निशी या नायिकाही महत्त्वपूर्ण कामगिरी करून दाखवत होत्या.

वहिदा रहेमान

गुरूदत्त यांच्या *सीआयडी*द्वारा रूपेरी पडद्यावर पदार्पण करणाऱ्या वहिदाने अल्पावधीतच शिखर गाठले. कृष्णधवल चित्रपटांच्या काळापासून रंगीत चित्रपटांच्या काळातही वहिदा सक्रीय राह्यली. ६०चे दशक पूर्ण होत आले तेव्हा साधना, सायरा बानू, आशा पारेख, तनुजा या नायिकांचा काळ आला.

मेरे मेहबूब द्वारा साधना स्टार झाली. *जंगली* द्वारा दबकतच हिंदी चित्रपटात पाय टाकणारी नसीम बानूची मुलगी सायराबानू पदार्पणातच हिट नायिका बनली. *दिल दे के देखो* द्वारा आशा पारेख, *कश्मिर की कली*द्वारा शर्मिला टागोर अशा नायिकांचे पदार्पण हिंदी पडद्यावर झाले. शर्मिलाने नंतर *आराधना, अमरप्रेम* सारख्या चित्रपटांमधून नरगीस, मीनाकुमारी यांची उणीव भरून काढली. याकाळातच *आंधी* चित्रपटाद्वारा सुचित्रा सेन या कसदार अभिनेत्रीने आपली उंची दाखवली. *जीवनज्योती*द्वारा आणखी एक बंगाली नायिका हिंदीत आली ती म्हणजे राखी. राखी, शर्मिला, जया भादुरी, मौसमी या बंगाली कन्यकांनी आपला एक विशिष्ट चाहता वर्ग निर्माण केला.

नृत्यांगना

वहिदा रहेमान हिच्याप्रमाणे दक्षिणेतून आलेल्या नृत्यांगना अभिनेत्रींमध्ये वैजयंती माला *देवदास, मधुमती, नया दौर, कठपुतली, न्यू दिल्ली* सारख्या चित्रपटात चमकली. हेमामालिनी राज कपूरच्या *सपनों का सौदागर* द्वारा हिंदी पडद्यावर चमकली नि बघता बघता ती हिंदी चित्रपटांची ड्रीमगर्ल बनली. *शोले, चरस, सीता और गीता* सारख्या चित्रपटांपासून ते गुलजार यांच्या *मीरा*, कमाल अमरोहींच्या *रझिया सुलतान*पर्यंत अनेक निर्मात्यां-दिग्दर्शकांकडे वैविध्यपूर्ण भूमिका हेमाने केल्या. सुमारे तीसेक वर्षे हेमा अभिनय कारकीर्दीत सक्रीय आहे. आजही काही वैशिष्ट्यपूर्ण भूमिका मिळाल्या तर ती पडद्यावर दिसते. कमल हासनच्या *हे राम* चित्रपटात हेमा महत्त्वाची भूमिका करतेय. हेमामालिनीनंतर दक्षिणेतील गाजलेल्या नायिका ठरल्या रेखा, श्रीदेवी, जया प्रदा, मीनाक्षी शेषाद्री.

शर्मिलाची समकालीन मुमताच हिने व्ही. शांताराम यांच्या *सेहरा* चित्रपटात संध्याची मैत्रीण म्हणून काम केले आणि आपल्या देहसौंदर्याने तिने दिलीपकुमारच्या *राम और श्याम* व तत्कालीन सुपरस्टार राजेश खन्नाची नायिका बनण्यापर्यंत मजल मारली. याच काळात व्ही. शांतारामांची कन्या राजश्री हिनेही चित्रपटात नायिकेच्या भूमिका केल्या पण व्ही. शांतारामांव्यतिरिक्त बाहेर कुठे तिने काम केले नाही व नंतर लग्न करून ती परदेशातच स्थायिक झाली. १९८०च्या दशकात डिम्पल, पद्मिनी कोल्हापुरे, रती अग्निहोत्री, पूनम धिल्लाँन, टीना मुनीम यांनीही बाजी मारली. यात डिम्पल तेवढीच फार काळ टिकून राह्यली. बाकीच्या लग्न करून संसारातच रममाण झाल्या.

कलात्मक चित्रपटांच्या स्रोतात स्मिता-शबाना

श्याम बेनेगल १९७५ सालच्या सुमारास वैचारिक नि उद्दिष्ट्यपूर्ण चित्रपटांचा प्रवाह घेऊन हिंदीत अवतरले. त्यांच्या चित्रपटांनीच हिंदी चित्रपटाला अनेक कसलेले कलावंत प्रदान केले. नसीरूद्दीन शाह, ओम पुरी, स्मिता पाटील, शबाना आझमी ही त्यातीलच काही नावे. यात नसीर व ओम जसे कलात्मक चित्रपटानंतर आज व्यावसायिक




चित्रपटात अवतरले तशा स्मिता व शबानाही कलात्मक चित्रपटांबरोबर व्यावसायिक चित्रपट करत होत्या. एकीकडे *निशांत*, *भूमिका*, *आक्रित*, *अर्थ*, *चक्र* करत असताना स्मिता *चटपटी*, *नमक हलाल*, *शक्ती*सारखे चित्रपट करत होती. तसेच *अंकूर*, *मंडी*, *पार*, *खंडहर*, *स्पर्श* करत असतानाच शबानाही *थोडीसी बेवफाई*, *जीना यहाँ*, *यह कैसा इन्साफ*, *हेराफेरी*, *हम पांच* सारखे तद्दन हिंदी चित्रपटही करत होती. मात्र एका ठराविक टप्प्यानंतर फक्त गुणवत्तापूर्ण चित्रपटच स्वीकारण्याचा निर्णय तिने घेतला व आज *गॉडमदर*पर्यंत तिने एक अभिमानास्पद असे स्थान गाठले. आज आंतरराष्ट्रीय कीर्तीची शबाना ही एकमेव भारतीय अभिनेत्री आहे.

लोकप्रिय नायक

नायिकांनंतर नायकांबद्दल बोलायचे झाले तर मास्टर विठ्ठलपासून ते शाहरूख खानपर्यंत शेकडो नायक चलचित्रपटाच्या पडद्यावर चमकले. मात्र अभिनेत्रींप्रमाणे हीरोंची रूपे, त्यांची इमेज, त्यांचे साहस व आंतरिक स्वरूप बदलत राहिले. एकेकाळचा हीरो उमदा, अत्यंत गुणी व आदर्श पुरूष असायचा. सुरूवातीच्या मूकपटांच्या काळात तर नायमपल्ली, डॉ. बिलिमोरिया, हिमांशू राय, पृथ्वीराज कपूर व जयराज लोकप्रिय होते. याशिवाय जाल मर्चंट, हरीश, ईश्वरलाल, शाहनवाज, मझहर खान यांचाही बोलबाला होता. यातील अनेक नायक मूकपट व बोलपटात सक्रीय झाले. शाहू मोडक, त्रिलोक कपूर, वास्ती, उल्हास, सप्रू हे सगळे एकेकाळी हीरो बनले व नंतर चरित्र अभिनेते बनले. अजित, प्रेमनाथ, प्राण व मदनपुरी सारखी मंडळी खलनायक होण्यापूर्वी नायक म्हणूनच पडद्यावर चमकली होती. १९३५ नंतर कलकत्ता, मुंबई, कोल्हापूर आणि लाहोरसारख्या केंद्रांमध्ये हिंदी चित्रपटांचे स्टुडियो अविरत गजबजत होते आणि धार्मिक, पौराणिक, सामाजिक असे सर्वच प्रकारचे चित्रपट बनत होते. यापैकी मोतीलाल, नासीर, सुरेंद्र सारखे नायक आले. नरगीसचा पहिला चित्रपट *तकदीर*मध्ये तिचा हीरो मोतीलाल होता तर सुरैयाच्या *ईशारा* या पहिल्या चित्रपटात तिचा नायक होता पृथ्वीराज कपूर.

दिलीपकुमार यांची संवादकला

चित्रपट बोलू लागला आणि संवादांच्या उच्चारणाची कला पडद्यावर मूळ धरू लागली. त्याकाळात रंगमंचावरचे कलाकारही पडद्यावर वावरत असल्याने रंगभूमीवर वापरले जाणारे संवादांचे नाटकीपण पडद्यावरही दिसू लागले. व्ही. शांताराम, प्रभात, सोहराब मोदींच्या चित्रपटात हा संवादांचा नाटकी बाज प्रामुख्याने दिसे. ह्या नाटकीपणातून चित्रपटाला बाहेर काढण्याचे साहस प्रथम केले ते दिलीपकुमार यांनी. दिलीपकुमारने अभिनयाची सहज शैली अवलंबली. त्याचबरोबर संवादफेकीचेही अगदी सर्वसामान्य रूप स्वीकारले. त्याच्या या संवादशैलीने पात्राला अधिकाधिक वास्तव बनवले. देवदास *बैजू बावरा*, *मुगल-ए-आझम*, *गोपी* सारख्या कित्येक चित्रपटांनी दिलीपकुमारला ट्रॅजेडी किंग बनवले. तर दुसरीकडे त्याचाच समकालीन राज कपूर निरागस भोळ्या नायकाच्या रूपात पडदा गाजवत होता. *जागते रहों*, *आवारा*, *अनाडी* अशा कितीतरी चित्रपटात राजने भोळसट युवकालाच पडद्यावर पेश केले. तर हरफनमौला ' देव आनंद रोमँटिक भूमिकांमध्ये राज-दिलीपच्याबरोबर स्पर्धेत यशस्वी ठरत होता. पण या त्रिकूटाच्या वर कडी करून होते दादामुनी अशोककुमार.



आवारा राज

राज कपूरची बेफिकीर इमेज तशी मेहबूब यांनी *अंदाज*मध्ये उभी केली पण राज कपूरने *आग*

व *बरसात* चित्रपटातील आपली ती इमेज *आवारा* व *श्री ४२०* मध्ये संपूर्ण बदलली. चार्ली चॅप्लीनच्या शैलीतील ही नवी इमेज राजने थेट रशियापर्यंत पोहोचवली. देशात नव्याने आलेल्या स्वातंत्र्याच्या वाऱ्याचे नि दुसरीकडे बेरोजगारीने पछाडलेल्या युवा पिढीचे दर्शन राजनी आपल्या चित्रपटात घडवले. त्यात नरगीसबरोबर त्याची जोडी उत्तम जमली आणि लोकांच्या तोंडी 'प्यार हुआ इकरार हुआ' सारखी राजच्या चित्रपटातील गाणी रूळली.

अशोककुमारने *अछूत कन्या*, *किस्मत* या चित्रपटात स्वतःची गाणी स्वतःच गायली. पण दिलीप-राज-देव आनंद हे त्रिकूट हिंदी पडदा गाजवू लागल्यावर गायक अभिनेत्याच्या भूमिका सोडून अशोककुमार वैविध्यपूर्ण भूमिका करण्याच्या मागे लागले. एवढे त्यांचे स्थान या तिघांनी डगमगवले. *ज्वेलथीफ*मध्ये खलनायक, *व्हिक्टोरिया २०३*मध्ये कॉमेडी भूमिका, *मेरी सूरत तेरी आँखे*मध्ये कुरूप गायक अशा भूमिका करून अशोककुमार आपली प्रतिभा सिद्ध करून दाखवायला कंबर कसत होते. अशोककुमार यांच्यानंतर ही हिंमत फक्त संजीवकुमारसारखा अभिनेताच तेवढा करू शकला. पण चौघे आपापल्या चित्रपटात सुपरस्टार असूनही या चौघांमध्ये ईर्षा बिलकूल नव्हती. दिलीप-राज मेहबूब यांच्या *अंदाज*मध्ये एकत्र चमकले. दिलीप-अशोककुमार *दीदार*मध्ये तर दिलीप-देव *इन्सानियत*मध्ये एकत्र आले.

मोठ्या कलाकारांच्या यादीत आणखीही काही नावे तेव्हा नक्कीच होती. त्यात भारतभूषण, प्रदीपकुमार, करण दीवाण, मनोजकुमार, राजेंद्रकुमार, राजकुमार, प्रेम अदीब हे कलाकारही होते. यानंतर काळ आला तो शम्मी कपूर, जॉय मुखर्जी, विश्वजित, जितेंद्र यांच्यासारख्या कलाकारांचा.

पण खऱ्या अर्थाने सुपरस्टार म्हणून काळ गाजवला तो राजेश खन्नाने. *आनंद*, *आराधना*, *अमरप्रेम*, *आशीर्वाद* सारख्या चित्रपटांनी राजेश खन्नाला शिखरावर नेऊन ठेवले. राजेश खन्नानंतर तो मान अमिताभने मिळवला. *जंजीर* चित्रपटात प्रकाश मेहरांनी देव आनंदला घ्यायचे ठरवले होते पण आपल्या वाट्याला एकही गाणे नसल्याचे सांगून देव आनंदने ती भूमिका नाकारली. कारण या चित्रपटापूर्वी *गाईड*, *ज्वेलथीफ*, *हम दोनों* सारख्या चित्रपटातील देव आनंदची गीते खूप गाजली होती. *जंजीर*मध्ये काम करायला नकार दिल्यावर नव्यानेच चित्रसृष्टीत आलेल्या अमिताभ बच्चनला *जंजीर*ची भूमिका दिली गेली आणि आधी *सात हिंदुस्तानी*, *रेश्मा और शेरा* अशा मोजक्या चित्रपटात संवेदनशील भूमिका केलेल्या अमिताभने *जंजीर*मध्ये प्रथमच अँग्री यंग मॅन रंगवला. *जंजीर* तुफान हिट झाला आणि अमिताभ स्टार झाला. इथून त्याची कारकीर्द भरवेगाने धावू लागली. हे स्टारपद अमिताभने सुमारे पंचवीस वर्षे उपभोगले.

*एक थी लडकी*ची मीना शौरी, *अनमोल घडी*ची नूरजहाँ, *शीश महल*ची नसीम, *जादू*ची नलिनी जयवंत, *सनम*ची सुरैया, *मदर इंडिया*ची नरगीस, *पाकीजा*ची मीनाकुमारी, *देवदास*ची सुचित्रा सेन, *दुनिया न माने*ची शांता आपटे, *काली घटा*ची बीना रॉय, *अलबेला*ची गीताबाली, *अफसाना*ची वीणा, *मुगल-ए-आझम*ची मधुबाला या कधीच विसरल्या जाणार नाहीत. तसेच *देवदास*चा दिलीपकुमार, *आवारा*चा राज कपूर, *गाईड*चा देव आनंद, *किस्मत*चा अशोक, *बाजार*मधील श्याम, *एक थी लडकी*तला मोतीलाल, *दो बिघा जमीन* व *हमलोग*मधील बलराज साहनी, *मौसम*चा संजीवकुमार, *अभिमान*चा अमिताभ, *शाहजहाँ*चा सायगल, *प्यासा*चा गुरूदत्त, *चौदहवी का चांद*चा रहेमान हे अभिनेते स्मृतिपटलावरून कधीच पुसले जाणार नाहीत. १९०० ते २००० हे शतक या दृष्टीने हिंदी सिनेमाचे एक अद्‌भुत शतक म्हणावे लागेल. पुढच्या शतकात सिनेमा तांत्रिक दृष्ट्या खूपच प्रगत झाला असेल पण या शतकात सिनेमाने जे माणिकमोती दिले ते माणिकमोती हीच हिंदी चित्रसृष्टीची अनमोल ठेव आहे. त्या ठेवीच्या नुसत्या व्याजावर पुढे शतकोन्‌शतके चित्रपट बहरत राहणार आहे. ●

